Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


**Multidisciplinary International E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2018

SPECIAL ISSUE-XXX

# IMPACT OF GST ON PRIORITY SECTORS OF INDIAN ECONOMY




**Guest Editor**

**Dr. Hiraman M. Kshirsagar**
Principal
MVP's Arts & Commerce College, Soygaon
Tal-Malegaon, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Chief Editor**

**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College, Yeola,
Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor : Dr. Manoj V. Jagtap**

**Associate Editor : Prof. Sachin G. Pawar**

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC) List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) - 0.676
SPECIAL ISSUE- 30 : IMPACT OF GST ON PRIORITY SECTORS OF INDIAN ECONOMY
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

# Index


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | GST Impact on Marketing & Economy | Dr. Jagdish J. Patil | 6 |
| 2 | Impact of GST on Inflation | Dr.D.R.Bacchav | 11 |
| 3 | GST Impact on Small & Medium Business | Dr. S. K. Pagar | 15 |
| 4 | Impact of GST on Priority Sectors in India | Dr. Hiraman M. Kshirsagar | 18 |
| 5 | Impact of GST on Industry | Dr. Amol A. Gaikwad | 23 |
| 6 | GST : An Overview | Dr. Patil Meena Fakira | 26 |
| 7 | Advantages and Disadvantages of GST | Dr.Pankaj Tryambak Nikam | 29 |
| 8 | Impact of GST on Manufacturing Sector | Mr. Kardak Santosh Eknath | 32 |
| 9 | How GST will affect Service Sector in India? | Dr. Jayashri P. Jadhav | 36 |
| 10 | GST and Customers: A Brief Study | Prof. Ankush Ananda Kapadne | 40 |
| 11 | Impact of GST on India's Foreign Trade | Prof.D.D.Gavhane<br>Prof. N.D.Wadghule | 43 |
| 12 | GST And Indian Economy | Swati Kisanrao Shelke | 48 |
| 13 | Goods and Service Tax-One Tax One Naton | Prof .Sonawane Rameshwar N. | 51 |
| 14 | The Impact of Goods and Service Tax (GST) on India's International Trade. | Prof .Nilesh.B .Nerkar | 54 |
| 15 | वस्तू व सेवा कर आणि भारतीय अर्थव्यवस्था | डॉ. करणसिंग राजपूत | 57 |
| 16 | वस्तु व सेवा कर (जीएसटी) - स्वरुप व फायदे-तोटे | प्रा. डॉ. सुनील पं. ठगले | 62 |
| 17 | जीएसटी : एक दृष्टीक्षेप | डॉ. कारे डी. एन. | 67 |
| 18 | यंत्रमाग उद्योगातील जॉबवर्क आणि जीएसटी | डॉ. सौ. जाधव लीला दोधा | 70 |
| 19 | जीएसटी : भारतीय कररचनेतील महत्वाचा बदल | प्रा. एम. व्ही. हिरे | 72 |
| 20 | भारतीय अर्थव्यवस्थेवरील जीएसटी परिणामांचे अध्ययन | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर एन. सोनवणे | 76 |
| 21 | भारतातील वस्तू व सेवा कराचे भवितव्य | प्रा. डॉ. ना. ना. गाढे | 80 |
| 22 | जीएसटीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव | प्रा. डॉ. मनोज विठ्ठल जगताप | 84 |
| 23 | जीएसटी : फायदे व तोटे | डॉ. मनीषा के. आहेर | 87 |
| 24 | जीएसटी आणि उत्पादन क्षेत्र | प्रा. सचिन जी. पवार | 90 |
| 25 | जीएसटीचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्राधान्य क्षेत्रावरील परिणाम | प्रा. मनोज पी. देशमुख | 93 |
| 26 | वस्तू व सेवा कर (GOODS & SERVICES TAX) | प्रा. समाधान पुंजाराम सूर्यवंशी | 95 |
| 27 | वस्तू व सेवा कर भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा. बागुल पुंडलिक एस. | 98 |


Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) - 0.676
SPECIAL ISSUE- 30 : IMPACT OF GST ON PRIORITY SECTORS OF INDIAN ECONOMY
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

# भारतीय अर्थव्यवस्थेवरील 'जीएसटी' परिणामांचे अध्ययन

**प्रा.डॉ. ज्ञानेश्वर एन्. सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
क. भा. हिरे कला महाविद्यालय, निमगांव, ता. मालेगांव जि. नाशिक

**गोषवारा :-**

कर आणि करप्रणाली ही भारतीय अर्थव्यवस्थेतील विकासाचा 'कणा' असतांना करप्रमणाली सदोष असणे हे कालसंगत नाही. म्हणून भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात मोठी कर सुधारणा (करप्रणाली सुधार) वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटी च्या माध्यमातून जुलै २०१७ पासून अंमलात आणलेली आहे. 'एक राष्ट्र : एक कर' तत्वावर आधारीत जीएसटी करप्रणालीचे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनेक सकारात्मक व नकारात्मक परिणाम संभवतात. प्रस्तुत अध्ययनातून जीएसटीच्या परिणामांचे वस्तूनिष्ट विश्लेषण मांडण्यात आलेले आहे.

**Keyword :- GST, Tax System, Indirect Tax, Indian Economy.**

**प्रस्तावना:**

भारतात १९५१ पासून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आर्थिक नियोजनास प्रारंभ झाला. नियोजन काळात आर्थिक विकास व कल्याण योजनांवर वाढता खर्च होत असतांना कर व करप्रणालीस असाधारण महत्व प्राप्त झाले. कर प्रणालीतील प्रत्यक्ष करापेक्षा अप्रत्यक्ष कर हे महसुल मिळवून देण्यासाठी अधिक महत्वाचे माणण्यात आले. अर्थात कर महसुल हा भारतीय अर्थव्यवस्थेत विकासाचा आधारस्तंभ ;ठंबाइवदमद्ध ठरलेला असतांना करप्रणालीत करावर कर म्हणजे दुहेरी कर, बहूकर आकारणी, कराचे उच्च दर, करचोरी, भ्रष्टाचार इत्यादी सारखे दोष निर्माण झाले. कर प्रणालीतील दोष दूर करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर सुधारणा करण्यात आल्या. परंतु जागतिकीकरणाच्या युगात अप्रत्यक्ष करात कालसापेक्ष अशा अमुलाग्र कर सुधारणांची आवश्यकता निर्माण झाली. म्हणून २००६ च्या अंदाजपत्रकात बहूकर प्रणाली ऐवजी एक कर प्रणाली विषयी भाष्य करण्यात आले. वस्तू व सेवा कर विधेयक १९ डिसेंबर २०१४ रोजी लोकसभेत मांडण्यात आले. ५ मे २०१५ रोजी लोकसभा व ३ ऑगस्ट २०१६ रोजी राज्यसभेत विधेयक पास करण्यात आले. ८ ऑगस्ट २०१६ रोजी संसदेप्रमाणेच राज्यांच्या विधानसभांनाही कर आकारणीचे निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करणारी १२२ वी घटना दुरूस्ती विधेयक २०१४ (राज्यघटनेच्या संघ सुचीतील ९२ व ९२ क आणि राज्यसुचीतील ५२ व ५५ कर समाप्त करणे) सर्व संमतीने पास करण्यात येवून १ जुलै २०१७ पासून जीएसटी कर प्रणाली लागू करण्यांत आली. जीएसटी कर प्रणालीद्वारे भारताच्या आर्थिक वृध्दीदरात वाढ होवून समान व निरंतर विकास युगाचा प्रारंभ झाला. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील विविध घटकांवर व क्षेत्रावर सकारात्मक परिणाम जसे अपेक्षित आहेत तसेच अपूर्ण व्यवस्थेमुळे काही नकारात्मक परिणाम सुध्दा निदर्शनास येत आहेत.

**अध्ययनाचे उद्देश:**

१. जीएसटी प्रणालीचा आढावा मांडणे.
२. भारतीय अर्थव्यवस्थेवरील जीएसटीच्या सकारात्मक परिणामांचे अध्ययन करणे.
३. भारतीय अर्थव्यवस्थेवरील जीएसटीच्या नकारात्मक परिणामांचे अध्ययन करणे.

**अध्ययन पध्दती :**

भारतीय अर्थव्यवस्थेवरील जीएसटी परिणामांचे अध्ययन हे द्वितीय (दुय्यम) तथ्यसंकलन स्त्रोतांवर आधारीत आहे. वृत्तपत्रे, नियतकालीके, ई—मॅगेझीन, ई—बुक, संकेतस्थळे इत्यादी साधनांच्या सहाय्याने संकलीत माहितीची मांडणी करून परिणामांचे अध्ययन मांडलेले आहे.



Scanned with OKEN Scanner

**वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणाली :**

वस्तू व सेवा कर (ळववके — ैमतअपबम ज्ंग) ही करप्रणाली १६५ देशामध्ये लागू असून भारतात १ जुलै २०१७ पासून लागू करण्यात आली आहे. मात्र ८ जुलै २०१७ रोजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी केंद्रीय वस्तू व सेवाकर (जम्मु:कश्मिर मध्ये विस्तार) व एकीकृत वस्तू व सेवा कर (जम्मु:कश्मिर मध्ये विस्तार) अध्यादेश २०१७ वर स्वाक्षरी करून देशात प्रथमच २८ राज्य व ७ केंद्रशासीत प्रदेशात 'एक राष्ट्र—एक कर' तत्वावर आधारीत जीएसटी प्रणालीची अंमलबजावणी सुरू झाली. जीएसटी अंतर्गत केंद्रीय जीएसटी (ब्ळैज) व राज्य जीएसटी (ैळैज) लागू करून संपूर्ण भारतात एका वस्तूवर एकच दराने कर आकारणी होणेमुळे कोणत्याही ठिकाणी एकाच समान किंमतीला वस्तू व सेवांची विक्री होईल. जीएसटी विषयक सर्व निर्णय घेण्यासाठी जीएसटी कौन्सीलची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री कौन्सीलचे अध्यक्ष असून केंद्रीय वित्त मंत्री, सर्व राज्यांचे वित्त मंत्री सदस्य म्हणून कार्य करतील. तसेच कर गोळा करणे, कर भरणा विवरण, कर परतावा, कर तक्रार इत्यादी विषयीची यंत्रणा जीएसटी नेटवर्क नावाने निर्माण करण्यात आली असून १३८० कोटी रूपये खर्चाच्या योजनेत विप्रो व इन्फोसीस संचलीत डीजीटल नेटवर्क मध्ये केंद्र व राज्यशासन सहीत स्प्ब् भ्वनेपदहए प्ब्प्ए भ्क्थ्ब् या संस्थांची भागीदारी आहे. ज्या व्यावसायिकांना व्यवसाय करावयाचा आहे अशा २० लाख रूपये पेक्षा अधिक च्या वार्षिक आर्थिक व्यवहार करणाऱ्या प्रत्येकाने नोंदणी करणे बंधनकारक आहे. वस्तू व सेवेशी संबंधीत कोणतेही विवरण भरण्यासाठी १५ अंकी नोंदणी क्रमांक व पासवर्ड देण्यांत आला आहे. प्रत्येक १ महिना, ३ महिने व वार्षिक लेखापरिक्षण विषयीच्या सर्व बाबी ऑनलाईन असणार आहेत.

**जीएसटीची वैशिष्ट्ये :**

१. जीएसटी प्रणाली ही वस्तू उत्पादन, विक्री व पुरवठा सेवावरील कराऐवजी फक्त वस्तू व सेवा पुरवठयावर कर आकारणीची प्रणाली आहे.
२. केंद्रशासनाच्या आठ विविध करांना समाप्त करून एकच केंद्रीय वस्तू व सेवा कर व राज्यशासनाच्या नऊ करांना समाप्त करून राज्य वस्तू व सेवा कर लागू करण्याची व्यवस्था आहे.
३. बहुकर पध्दती ऐवजी 'एक राष्ट्र—एक कर' प्रणालीचा अंमल सुरू होवून संपूर्ण भारतात समान किंमतीस चालना देण्यात आली.
४. मद्य, पेट्रोल क्रुड, मोटार स्पिरीट, हायस्पीड डिझेल, नैसर्गिक वायू व एव्हीएशन टर्बाईन फ्युअल वगळता सर्व वस्तू व सेवांना जीएसटी लागू असेल.
५. तंबाखू व तंबाखूजन्य उत्पादनासाठी फक्त केंद्रालाच उत्पादन शुल्क आकारण्याचा अधिकार असणार आहे.
६. वस्तू व सेवा कर प्रणाली अंतर्गत १२११ वस्तू व सेवाकराच्या कक्षेत येणार असून चार स्लॅबनुसार ५:, १२:, १८:, व २८: दराने कर आकारणी होणार आहे.
७. करमणूक व मनोरंजन कर आकारणी व गोळा करण्याचे अधिकार पंचायत राज संस्थांना असणार आहेत.
८. राज्य शासनाचे आर्थिक नुकसान होणार असेल तर पाच वर्षापर्यंत नुकसान भरपाई केंद्राकडून देण्याची तरतूद आहे.
९. वस्तू व सेवा कर प्रणालीत करदाता आणि कर वसूल प्राधिकारी यांच्यात किमान प्रत्यक्ष संवाद असून सर्व प्रक्रिया ही ऑनलाईन असणार आहे.
१०. कराचा परतावा तरतुदी सोप्या असून नव्वद दिवसाचे आत परतावा मिळण्याची तरतूद आहे.
११. लेख परिक्षणाची स्थिर प्रक्रिया दिलेली असून त्यामध्ये शिस्त आणण्याचा प्रयत्न असणार आहे.



Scanned with OKEN Scanner

१२. संपूर्ण भारतात २ ट्रीलीयन डॉलर्सची अर्थव्यवस्था व १२७ कोटी भारतीयांची एक सर्वसमावेशक बाजार व्यवस्था निर्माण होणार आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेवरील जीएसटीचे परिणाम:**

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी व आदी गोदरेज यांच्यामते जीएसटी एक पारदर्शी करप्रणाली असल्याने करचोरी कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे शासनाच्या कर महसुलात वाढ होण्यास मदत होईल. जीएसटीच्या पहिल्या तिमाहीत ११००० कोटी रूपये अपेक्षीत असतांना १२२८३ कोटी रूपये महसुल प्राप्ती झाली.

२. एचडीएफसी चे दिपक पारेख यांच्या मतानुसार देशाच्या GDP मध्ये १५० ते २०० BPs अर्थात १.५: ते २.०: ने वृध्दी होवून आर्थिक विकासाला अधिक चालना मिळेल.

३. वस्तू व सेवा पुरवठा करणाऱ्या सर्व (२० लाख रूपये पेक्षा अधिक वार्षिक व्यवहार मूल्य असणाऱ्या) व्यापाऱ्यांना GST Network मध्ये नोंदणी केल्याशिवाय व्यवहार प्रक्रियेत सहभागी होवून इनपूट टॅक्स क्रेडीट मिळविता येणार नाही. त्यामुळे करदात्यांचे प्रमाण वाढून कर आधाराचा विस्तार होईल.

४. वित्तमंत्री अरूण जेटली, क्रीसीलचे डी. के. जोशी आणि अर्न्स्ट ऍंड यंग (ईवाई) चे अभिषेक जैन नुसार करावर कर अर्थात दुहेरी कर आणि बहूविध कर प्रणाली बंद होण्यामुळे कराच्या दरात सरासरी १४ ते १६: ने घट होवून देशातील सर्वसाधारण किंमत पातळीत घट होईल. टाटा मोटर्सने कारच्या किंमतीत १२: घट (३३०० ते २१७००० रूपये) केली.

५. व्यापारी वर्गास एक्साईज डयूटी, सर्व्हीस टॅक्स, सेल टॅक्स ऐवजी फक्त एकच कर भरावा लागणार असल्याने (३० ते ३५: ऐवजी सरासरी १२ ते १८: कर) कर बचत व कर सुलभता वाढणेस चालना मिळेल. त्याद्वारे उत्पादन व पुरवठा प्रमाण वाढणेस मदत होईल.

६. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्यानुसार 'एक राष्ट्र— एक कर' प्रणालीमुळे संपूर्ण भारतात एक वस्तू समान किंमतीला उपलब्ध होण्याची व्यवस्था वृध्दींगत होवून लोकशाही प्रणाली अधिक मजबूत होणेस सहाय्यक होणार आहे.

७. जीएसटी प्रणाली अंतर्गत ई—वे (e-way) कार्यप्रणालीचा वापर करण्यामुळे लैज्छ नंबर वरून कर भरणा विवरण प्राप्त होणार असल्याने राष्ट्रीय व राज्य मार्गावरील टोल जाम कमी होईल. तसेच राज्या—राज्यातील कर समानतेमुळे वस्तूंचे आंतरराज्य मुक्त अवागमन शक्य होईल.

८. ग्लोबल हंट चे सुनिल गोयल यांच्यानुसार GST प्रणालीमुळे पहिलया तिमाहीत १ लाख रोजगार तर अर्थव्यवस्थेत किमान १३ लाख रोजगार निर्मिती होऊ शकेल. रोजगारात वार्षिक १० ते १३: नी वाढ होईल.

९. आजतक चे ब्यूरो चीफ अंशुमन तिवारी यांच्यानुसार भारतात चीनी वस्तूंची आयात कमी होवून देशी उद्योगांच्या वस्तूंना मागणी निर्माण होणेस अधिक वाव आहे.

१०. जीएसटी प्रणाली डीजीटल आणि ऑनलाईन असल्याने पारदर्शकता वाढले, करचोरी कमी होणे, भ्रष्टाचार नियंत्रण होवून करप्रणालीत अनुशासन वाढणेस मदत होईल.

११. जीएसटी कर प्रणालीमुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेस ६० लाख कोटी रूपयेचा लाभ मिळणार आहे.

१२. जीएसटीमुळे शासनाच्या कर महसुलात वाढ होईल त्यामुळे केंद्राला अधिक लाभ मिळेल मात्र राज्यांना ९५०० कोटी रूपयेचे नुकसान सहन करावे लागण्याची शक्यता आहे.



Scanned with OKEN Scanner

१३. बँक आणि विमा व वित्त क्षेत्रावर १४: ऐवजी १८—२०: पर्यंत प्रोसेसिंग फी, वीमा हप्ता, डेबीट, क्रेडीट कार्डवरील सेवा महाग होण्याचा धोका आहे.

१४. सुरेश रहेजा (रियल इस्टेट, मुंबई) यांच्यानुसार रियल इस्टेट क्षेत्रावरील किंमतीत वाढ होवून या क्षेत्रावर विपरीत परिणाम संभवतात.

१५. व्यापारी वर्गास इनपूट टॅक्स क्रेडीट मिळवून देणारी व्यवस्था ही गुंतागुंतीची आणि विसंगत स्वरूपाची असल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

१६. भारतातील अल्पशिक्षीत व्यापारी व तांत्रिक कौशल्य आत्मसात नसलेल्या व्यापारी वर्गास जीएसटी नेटवर्क मध्ये काय करणे अत्यंत अवघड आहे.

१७. जीएसटी अंतर्गत कर दरांच्या बाबत शासन, प्रशासन व व्यापारी यांच्यात संभ्रमाची अवस्था निर्माण झालेली आहे.

**सारांश:**

वस्तू व सेवा कर प्रणाली लागू होण्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेस लाभ मिळून दिर्घकाळासाठी सकारात्मक परिणाम होणार आहेत. त्याद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास जलद घडून येण्यास मदत होईल. परंतू अल्पकाळासाठी अर्थव्यवस्थेत विपरीत परिणाम सुध्दा दिसून येत आहेत. यावर शासन व प्रशासन पातळीवर विचारमंथन होणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१) जीएसटी अॅक्ट कायदा (मराठी) ई—बुक
२) जीएसटी बील गाईड (हिंदी) ई—बुक
३) करंट अफेअर, सप्टें २०१६, पृष्ठ क्र.५२
४) वस्तू व सेवा कर — आढावा, १ जुलै २०१६, नवी दिल्ली
५) इंडीया टूडे, १२ जुलै २०१७, पृष्ठ क्र. २०, २६
६) मोनिका गुप्ता, आजतक, १ जुलै २०१७
७) https://nationalinsuranceblog.com
८) https://m. busineesstoday.in
९) https://taxguru.in
१०) www.thehindubusinessline.com
११) https://khabar.ndtv.com